# गुरुमाई चिद्विलासानंद यांच्याद्वारे लिखित पुस्तक

# अंत:शुद्धीचे सोपान

## *उद्धरण ६*

एकदा दोन मित्र रस्त्यावरून चालले होते. त्यांपैकी एकाला वर्तमानपत्र विकत घ्यायचे होते, म्हणून ते दोघे एका वर्तमानपत्र विक्रेत्याच्या दुकानाजवळ थांबले. त्या माणसाने विक्रेत्याला विनम्रतेने धन्यवाद दिले. विक्रेता, अभिस्वीकृतीचा एकही शब्द न उच्चारता त्याच्याकडे निर्विकारपणे बघत राहिला. दुसरा मित्र म्हणाला, "किती वाईट मूडमध्ये आहे हा माणूस."

यावर त्याचा मित्र म्हणाला, "अरे, तो रोज रात्री असाच असतो."

"मग तू त्याच्याशी इतक्या विनम्रतेने का वागतोस? तू वर्तमानपत्र विकत घेण्यासाठी पुन्हापुन्हा इथेच का येतोस?"

पहिल्या मित्राने उत्तर दिले, "मी कसे वागावे याचा निर्णय मी त्याच्या हाती का सोपवू?"

जेव्हा तुम्ही दुसऱ्या व्यक्तीला तुमच्या कार्यांवर नियंत्रण करू देता, तेव्हा ते निश्चितपणे सन्मानाची उणीव दर्शविते—तुमच्या क्षमतांकरिता नाही, कारण तुम्ही अजूनही गाऊ शकता, नृत्य करू शकता, तुम्ही अजूनही तुमचे काम करू शकता. नाही, ही तर याची खूण आहे, की तुमच्या हृदयातील प्रकाशाबद्दल तुम्हाला सन्मान नाही, त्या परमेश्वरावर श्रद्धा नाही, जो तुमच्या अंतरी निवास करतो.

असे कसे होते? एखादी व्यक्ती स्वत:बद्दलचा, ईश्वराबद्दलचा, सृष्टीबद्दलचा सन्मान कसा काय गमावून बसते? बायबलमध्ये असे लिहिले आहे, "जो कोणी कपट आचरणात आणतो, तो माझ्या निवासस्थानी राहणार नाही. जो खोटे बोलतो, त्याला माझ्या सान्निध्यात राहता येणार नाही."

© २०२२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

गुरुमाई चिद्विलासानंद, *अंत:शुद्धीचे सोपान : दिव्य सद्गुणांचा योग,* अध्याय ९ 'सन्मान,' यामधून उद्धृत [चित्शक्ती पब्लिकेशन्स, २०१३], पृ. १४०-१४१.